# 'ग्रामीण भागातील मागणी घटल्याने पेच'



यशवंत सिन्हा

पुणे, ता. २३ : शेतीतून शेतकऱ्यांना पुरेसे पैसे मिळत नसल्याने ग्रामीण भागातील रोजगार कमी झाला आहे. त्यामुळे त्या भागात वस्तूंची खरेदी घटली आहे. त्याचा परिणाम मागणीवर झाला असून अर्थव्यवस्था संकटात आली आहे, असे मत माजी केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी व्यक्त केले.

'गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक'च्या वतीने आयोजित 'इकॉनॉमिक स्लोडाऊन : स्ट्रक्चरल ऑर सायकलिकल' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. प्रा. संगीता श्रॉफ या वेळी उपस्थित होत्या. सिन्हा म्हणाले, ''बांधकाम क्षेत्रातील नोकऱ्या कमी झाल्याने ग्रामीण भागातील लोक मनरेगासारख्या योजनेच्या ठिकाणी कामे करीत आहेत. नोटाबंदी आणि त्यापाठोपाठ आलेल्या जीएसटीचा असंघटित क्षेत्र, बांधकाम आणि सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांवर विपरीत परिमाण झाला आहे. कॉर्पोरेट क्षेत्रावर देखील या बाबींचा परिमाण जाणवू लागला आहे. वित्तपुरवठ्यातील एक तृतीयांश पैसे हे बंद पडत असलेल्या व्यवसायांवर खर्च करण्यात येत आहेत. कॉर्पोरेट कर कमी करण्याच्या निर्णयामुळे चारशे कोटींची उलाढाल असलेल्या अवघ्या ०.७ टक्के कंपन्यांना फायदा होईल.''

जीडीपी वाढविण्यासाठी बचत वाढायला हवी. तसे झाल्यास गुंतवणूक व मागणी वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ''जीडीपी मोजण्याच्या नव्या निकषांमुळे केंद्र सरकारची अर्थविषयक कामगिरी दमदार असल्याचे दिसून येईल,'' असा टोलाही त्यांनी लगावला.



**गोखले इन्स्टिट्यूट : माजी केंद्रीय अर्थमंत्री यशवंत सिन्हा यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.**

## 'विरोधाची मानसिकता जिवंत ठेवायला हवी'

**कोथरुड :** विरोधाची मानसिकता लोकशाहीसाठी जिवंत ठेवली पाहिजे, अन्यथा लोकशाहीचे भवितव्य धोक्यात येईल, असा इशारा यशवंत सिन्हा यांनी दिला. गांधी स्मारक निधी येथे युवक क्रांती दलातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. सिन्हा म्हणाले, ''विरोधी मत मांडणे हे देशविरोधी मानले जाते. मला इमानदारीचा मार्ग पकडायचा असल्याने पक्षीय राजकारण सोडले, आणि भयमुक्त होउन बोलायला, लिहायला सुरवात केली. काश्मीरमध्ये मार्शल लॉ सारखे वातावरण आहे. मूलभूत अधिकार नाकारले जात आहेत, आणि सर्व देशात आनंदाचे वातावरण झाल्याचे सांगण्यात आले. संविधानातील गोष्टी काश्मीरमध्ये डावलण्यात आल्या.''